गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ११४ वा ● सोमवार ११ सप्टेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 115 | Date : 11/09/2023 | blow : Manday | Page 4 | Price 4


## चंद्राबाबूंना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

हैदराबाद : भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अटक करण्यात आलेले तेलुगू देसम पार्टीचे प्रमुख आणि आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांना रविवारी विजयवाडा 'एसीबी' न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी



सुनावली. ३७१ कोटी रुपयांच्या आंध्र प्रदेश कौशल्य विकास महामंडळातील घोटाळा प्रकरणी आंध्र प्रदेशच्या गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) त्यांना शनिवारी अटक केली होती. आंध्र प्रदेशमध्ये २०१४ मध्ये बेरोजगार तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी आंध्र प्रदेश राज्य कौशल्य विकास महामंडळ स्थापन करण्यात आले होते. तत्कालीन मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या सरकारने हा निर्णय घेतला होता. या महामंडळातमध्ये ३७१ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप चंद्राबाबू यांच्यावर आहे.

## ठाण्यात लिफ्ट कोसळून ६ ठार तर २ जखमी

ठाणे : ठाणे येथील बाळकुम परिसरातील रुणवाल आयरीन या निर्माणधीन इमारतीच्या ४० मजल्यावरून उदवाहक कोसळून सहा कामगारांचा मृत्यू झाला आहे. एक कामगार गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. खाजगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. रविवारी सायंकाळी ही घटना घडली असून या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे. हा अपघात नेमका कसा झाला याविषयी अद्याप समजू शकलेले नाही. महेंद्र चौपाल (३२ ), रुपेश कुमार दास (२१), हारून शेख (४७), मिथलेश (३५), कारिदास (३८), अशी पाच मृत कामगारांची नावे आहेत तर, एक कामगारांचे नाव समजू शकलेले नाही. सुनिल कुमार दास (२१) हा कामगार गंभीर जखमी आहे. बाळकुम येथील नारायणी शाळेच्या बाजूला रुणवाल आयरीन या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. ४० मजल्याची ही इमारत आहे. या इमारतीच्या छतावर रविवारी वॉटरप्रूफिंगचे काम सुरू होते. हे काम संपवून कामगार सायंकाळी ५.३० वाजता उदवाहकने खाली येत होते. त्यावेळी उदवाहकाचा दोर तुटून अपघात झाला.

खाजगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. हा अपघात नेमका कसा झाला याविषयी अद्याप समजू शकलेले नाही.

# जी-२० परिषदेचा पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून समारोप

नवी दिल्ली : दिल्लीत आयोजित दोन दिवसीय जी-२० शिखर परिषदेचा 'स्वस्ती अस्तु विश्व' म्हणजेच विश्वाच्या शांततेसाठी या प्रार्थनेने समारोप करण्यात आला. रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या परिषदेचा समारोप केला. तसेच २०२४ मधील जी-२० च्या अध्यक्षपदाची सूत्रे ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा यांच्याकडे सोपवली. आजच्या तिसऱ्या आणि अखेरच्या सत्रानंतर पंतप्रधान मोदी यांनी ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ लुला दा सिल्वा यांच्याकडे अध्यक्षपदाचे प्रतीक असणारा वॉवेल सुपुर्द करत त्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर अध्यक्ष लुला दा सिल्वा यांनी ब्राझीलच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळाचा प्राधान्यक्रम सांगितला. भूक आणि दारिद्र्य याविरुध्द वैश्विक आघाडी तयार करणे त्याचप्रमाणे पर्यावरण बदलाच्या संकटाचा सामना करण्यासाठी जगाला एकत्र आणणे यासाठी दोन कृती गट तयार करण्यात येतील, असेही ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांनी स्पष्ट केले.

शिखर परिषदेच्या समारोप समारंभात पंतप्रधान मोदी म्हणाले, मी जी-२० शिखर परिषदेचा समारोप झाल्याचे घोषित करतो. एक पृथ्वी, एक कुटुंब आणि एका भविष्याचा रोडमॅप आनंददायी असेल. १४० कोटी भारतीयांच्या वतीने आपल्या सर्वांना खूप खूप धन्यवाद. मी ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ यांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो आणि त्यांच्याकडे २०२४ च्या जी-२० चे अध्यक्षपद सोपवतो.



## जरांगे-पाटील यांचा आता वैद्यकीय तपासणीलाही नकार



जालना : अंबड तालुक्यातील आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणास रविवारी तेरा दिवस झाले. शनिवारी रात्रीपासून जरांगेपाटील यांनी औषध, पाणी, आणि सलाईन घेणे लांबच परंतु नियमित होणाऱ्या तपासणीसही नकार दिला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, आजपर्यंत मी सरकारचे ऐकले. शब्दाला जागलो. मात्र, सरकार शब्दाला जागत नाही. आम्ही जी मागणी केली ती पूर्ण होत नाही. मराठा समाजाला सरसकट आरक्षण देत नाहीत, तोपर्यंत आमरण उपोषण सुरू ठेवणार. सरकारने हवे तेवढा वेळ घ्यावा मी उपोषणावर ठाम असल्याचे जरांगे-पाटील यांनी सांगितले.

सरकारने तीनवेळा प्रतिनिधी पाठवून जरांगे पाटील यांचे मन वळवण्याचे प्रयत्न केले. परंतु, । पान २ वर

## 'जे गेलेत त्यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे दरवाजे बंद', शरद पवार स्पष्टच म्हणाले...



मुंबई : 'जे गेलेत त्यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे दरवाजे बंद झालेत', असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले आहेत. अजित पवारांसोबत सत्तेत गेलेल्या आमदार, पदाधिकाऱ्यांबाबत बोलतांना शरद पवारांनी हे वक्तव्य केलंय. तर यावेळी शरद पवारांनी केंद्र सरकारवर देखील निशाणा साधला आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये राष्ट्रवादीचे सर्व आमदार, खासदार आणि जिल्हाध्यक्षांची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला शरद पवार यांनी संबोधित केलं. महाविकास आघाडीमध्ये ज्या काही आपल्या वाटेला ७०-८० येतील त्याच्या तयारीला लागण्याचं आवाहन देखील शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे.

जी-२० च्या आमंत्रण पत्रिकेवर प्रेसिडेंट ऑफ भारत असं नाव टाकल्यानंतर राजकीय वर्तुळात दावे- प्रतिदाव्यांना सुरुवात झाली. यावर शरद पवार यांनी देखील भाष्य केलं आहे.देशाचं नाव बदलण्याचा इतका अट्टाहास का हा सवाल यावेळी शरद पवार यांनी उपस्थित केला आहे. पुढे बोलतांना त्यांनी म्हटलं की, 'मग आता गेटवे ऑफ इंडिया आणि रिझर्व्ह बँकेचे देखील नाव बदला.'

'जी -२० सारख्या परिषदा यापूर्वी दोनदा । पान २ वर

## राष्ट्रीय लोकअदालतीत २३० प्रकरणे निकाली, ७ कोटी २१ लाख रुपयांची वसुली

पंढरपूर/प्रतिनिधी: महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुबंई यांच्या निर्देशानुसार तालुका विधी सेवा समितीच्यावतीने राष्ट्रीय लोकअदालतीचे पंढरपूर येथे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये २३० प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली आहेत. या प्रकरणामध्ये, एकूण ७ कोटी २१ लाख ३० हजार ८१८ रुपयांची तडजोड झाली असल्याची माहिती जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे प्रभारी अध्यक्ष श्री. बी. बी. तोष्णीवाल यांनी दिली.



जिल्हा न्यायालय पंढरपूर येथे दिनांक ९ सप्टेंबर २०२३ रोजी या लोकअदालतीमध्ये प्रलंबीत १८ हजार ४१९ प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी १९९ प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यामध्ये ६ कोटी २८ लाखांची वसुली झाली. तसेच २ हजार ७५० दाखल पुर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. । पान २ वर

## राज्य मंत्रिमंडळ विस्तार गणेशोत्सवापूर्वी होणार

कोल्हापूर : गणेशोत्सवापूर्वी राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आणि पालकमंत्रिपदाचे वाटप होणार आहे. विस्तार होऊन नवीन मंत्री आणि पालकमंत्री हे गणेशोत्सवापूर्वी संपूर्ण राज्यभरात स्थिरावलेले आपल्याला पाहायला मिळतील, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत मंत्रिमंडळ विस्ताराबाबत भाष्य केले. खासदार तटकरे म्हणाले की,राज्याच्या मंत्रिमंडळात आम्ही सहभागी झालो, त्याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पालकमंत्रिपद देण्याचे निश्चित झाले. मंत्रिमंडळाचा विस्तार सध्या राहिलेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्र्यांवरसुध्दा वेगवेगळ्या जिल्ह्यांची पालकमंत्रिपदांची जबाबदारी देण्यात येणार आहे. पुण्याच्या पालकमंत्रिपदावर पक्षाकडून करण्यात येत असलेल्या दाव्याबाबत तटकरे म्हणाले की, राष्ट्रवादीचा दावा किती ठिकाणी याची चर्चा करण्यापेक्षा आम्ही आता एकत्रित काम करायचे ठरविलेले आहे. त्यामुळे दावा माध्यमांमध्ये मांडण्यापेक्षा मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, तीनही पक्षांचे अध्यक्ष एकत्र बसून निर्णय घेऊ. पालकमंत्रिपदावरून काहीही वाद होणार नाही. आम्ही सर्व एका दिशेने चाललो आहोत. आमचे जेवढे मंत्री आहेत,

तेवढी पालकमंत्रिपदे आमच्या वाट्याला येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारमध्ये सहभागी होऊन राज्याला प्रगतिपथावर नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# वागदरी येथे आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते ११कोटी विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा







अक्कलकोट/प्रतिनिधीः वागदरी येथे अक्कलकोट विधानसभा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते अकरा कोटीच्या विविध कामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला

यावेळी कार्यक्रम अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ नेते वागदरी ग्रामपंचायत सदस्य श्रीशैल ठोंबरे हे होते यावेळी सोलापूर लोकसभेचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम घेण्यात आले यावेळी व्यासपीठावर स्वामी समर्थ साखर कारखान्याचे चेअरमन श्री संजीवकुमार पाटील,श्री मोतीराम राठोड श्री शिवशरण जोजन, श्री आप्पासाहेब बिराजदार श्री महेश हिंडोळे, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती चेअरमन श्री अप्पू परमशेट्टी, सौ.सुरेखाताई होळीकट्टी, श्री राजू बंदीछोडे, श्री गुंडप्पा पोमाजी,श्री सिद्धाराम बिराजदार,श्री प्रदिप जगताप,श्री धोंडप्पा यमाजी, वागदरी सरपंच श्री श्रीकांत भैरामडगी, उपसरपंच लक्ष्मीबाई पोमाजी,श्री बसवराज शेळके, उपसरपंच श्री सागर कल्याणशेट्टी, श्री शाणप्पा मंगाणे,श्री प्रदीप पाटील,श्री कमलाकर सोनकांबळे,उपस्थित होते यावेळी वागदरी ग्रामस्थांच्या वतीने क्रेनच्या सहायाने मोठा हार घालून जंगी सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.यावेळी वागदरी परिसरातील कार्यकर्त्यांना संपर्क होण्यासाठी भाजपा संपर्क कार्यालय उद्घाटन आमदार सचिन कल्याणशेट्टी व भाजपा तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना प्रदीप पाटील यांनी वागदरी गावासाठी विकास कामासाठी दिलेले निधी यांची सविस्तर मांडणी केले यावेळी गडीनाड रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री एस एस शेळके प्रशालेचे चेअरमन बसवराज शेळके यांचे खाजदार जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले नूतन तंटामुक्त समिती अध्यक्ष शरणप्पा मंगाणे यांचे ही सन्मान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले की वागदरी जिल्हा परिषद मतदार संघातील सर्व मतदाराचे मी आभार मानतो त्यांनी माझ्या पाठीशी खंबीर उभे राहिलात वागदरी गाव असू द्या किंवा वागदरी जिल्हा परिषद मतदार संघ असू द्या प्रत्येक गावातील विकास कामासाठी मी निधी कमी पडू देणार नाही, गावाच्या विकासासाठी आपण सर्वांने जोमाने कामाला लागून केंद्रात व राज्यात भाजपाचे सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करावे लागेल, केंद्र व राज्य शासनाने गोर गरीब जनतेसाठी राबिवण्यात येणारे विविध योजनेचे माहिती सर्व सामान्य लोकांपर्यंत पोचविण्याचे काम करावे, राज्यामध्ये एकनाथ शिंदे, देविंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना एक रुपयामध्ये पीक विमा योजना चालू केले आहे आणि केंद्राच्या प्रधान मंत्री कृषी सन्मान योजना अंतर्गत मिळणाऱ्या २००० प्रमाणे शेतकऱ्यांना राज्य शासन ही लवकर दोन दोन हजार रुपये शेतकऱ्याच्या खात्यावर जमा करणार आहेत हे सरकार सर्व सामन्याच्या हितासाठी , विकासासाठी प्रयत्न करणारे सरकार आहे यापूर्वी अक्कलकोट तालुक्यातील अनेक गावांना जोडणाऱ्या रस्ता खूप खराब होते ते सर्व रस्ते आज जवळ पास चांगल्या प्रकारे होताना दिसत आहे या भागातील शेतकऱ्याचे विजेचे समस्या मोठी होते ते देखील समस्या भुरिकवठे येथे ३३के व्ही उपकेंद्र झाल्यामुळे समस्या गेले असून शेतकऱ्यांना चांगले वीज पुरवठा होत आहे.

## शाम बाबर यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश

यावेळी खा. डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामी यांनी केंद्राच्या विविध योजना व प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या नऊ वर्षाच्या कार्याचा माहिती लोकांना समजावून सांगितले यावेळी वागदरी जील्हा परिषद गटातून मोठ्या संख्येने जन समुदाय उपस्थित होते यावेळी वागदरी गावामध्ये संजय गांधी निराधार योजना अंतर्गत ३०० लाभार्थी यांना लाभ मिळवून दिल्याबद्दल संजय गांधी निराधार समिती सदस्य सुनील सावंत यांचे विशेष सत्कार करण्यात आले

वागदरी येथील संघर्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्याम बाबर व त्यांच्या मित्रपरिवाराच्या असंख्य कार्यकर्त्यांसह भाजपा पक्षामध्ये जाहीर प्रवेश करण्यात आले यावेळी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, भाजपा तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, हनूरचे उपसरपंच सागर दादा कल्याणशेट्टी, बसवराज शेळके, प्रदीप जगताप, भाजपा महिला तालुकाध्यक्ष सुरेखा होळीकट्टी , श्रीशैल ठोंबरे या मान्यवराच्या प्रमुख उपस्थित नवीन भाजपा कार्यकर्त्यांचे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले. या कार्यक्रमात इ डब्ल्यू एस अंतर्गत एम एस सी बी मध्ये नव्याने भरती झालेल्या विद्युत कर्मचाऱ्यांचे व एमबीबीएस मध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री कल्लप्पा बिराजदार,श्री सिद्धाराम बटगेरी ,श्री सुनील सावंत, श्री प्रकाश पोमाजी,श्री संतोष पोमाजी,श्री शंकर उणदे,श्री सतीश कणमुसे,श्री श्रीमंत कुंटोजी,श्री सिद्धाराम मठपती,सौ विद्याताई स्वामी,श्री बाळासाहेब भोसले, श्री बाबन जमादार,श्री राजू पटणे,श्री राजू किवडे, श्री राजकुमार हुग्गे,श्री हनिफ मुल्ला,श्री घाळय्या मठपती,श्री हणमंत घोदे,श्री वीरभद्र पुरंत, श्री राजू मंगाणे,श्री बसवराज पाटील,श्री शिवा घोळसगाव,श्री श्याम बाबर,श्री महादेव सोनकवडे,जयश्री बटगेरी, सविता चलगिरी, रूपा शीरगण, जयश्री पाटील, दौलप्पा सरसंबे, पिंटू गावडे ,राजकुमार पोमाजी, मडप्पा उमराणे अशोक सावंत, सुनील गाडीवडार, श्रीशैल चौगुले, धनराज सलगरे, रमेश मंगाणे व तसेच वागदरी जि. पं गटातील सरपंच, पदाधिकारी,कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## ✻ सुविचार ✻

समोर अंधार दिसत असला तरीही त्यापलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.

## संपादकीय

### साथ देण्याची गरज...

नेत्रदानाशी संबंधित गैरसमज दूर करून नेत्रदान करण्यासाठी लोकांना प्रेरणा देणे हा त्यामागचा उद्देश आहे. तथापि या विषयावर अपेक्षित जागृती अद्यापही दूरच आहे, असा या विषयाशी संबंधित संस्थांचा आणि कार्यकर्त्यांचा अनुभव आहे. भारतात सुमारे दीड कोटींपेक्षा जास्त लोक अंध आणि सुमारे तेरा कोटींपेक्षा जास्त लोक अंशतः अंध आहेत, असा जागतिक आरोग्य संघटनेचा निष्कर्ष आहे. नजीकची दृष्टी कमी झाल्याची रुग्णसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, असे 'इंटरनॅशनल एजन्सी फॉर प्रिव्हेन्शन ऑफ द ब्लाइंडनेस' या संस्थेचे निरीक्षण आहे. त्या तुलनेत नेत्रदानाचे प्रमाण अत्यल्प म्हणावे असे आहे. दरवर्षी साठ हजार नेत्रदान केले जाते. कोरोना काळानंतर आकडेवारीत घसरण झाल्याचे आणि नेत्रपेढ्यांची संख्याही कमी झाली आहे. उपरोक्त आकडेवारी भीतीदायक आणि अस्वस्थ करणारी आहे. भारतीय संस्कृतीत नेत्रदानाचे अपरंपार महत्त्व सांगितले आहे. त्याची महती वर्णन करणाऱ्या अनेक पुराणकथा घराघरात लहान मुलांना सांगितल्या जातात. नेत्रदान श्रेष्ठ दान मानले जाते. अंधत्व असलेल्या व्यक्तीच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने प्रकाश पेरण्याचे काम नेत्रदान करू शकते. त्यासाठी गरजू माणसे वर्षानुवर्षे वाट पाहतात. त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या वेदनेची कल्पना खचितच कोणी करू शकेल. डोळ्याला पट्टी बांधून एखादा तास घालवा, असे आवाहन एखाद्या संस्थेने केले तर किती माणसे तयार होतील? वास्तविक मरणोत्तर नेत्रदान करण्यासाठी इच्छुक व्यक्तीला किंवा दात्याला कुठेच न्यावे लागत नाही. फक्त जवळच्या नेत्रपेढीत नाव नोंदवावे लागते. नाव नोंदवलेले असेल तर संबंधित तज्ज्ञ त्या व्यक्तीच्या घरी येतात. या क्षेत्रात अनेक संस्था स्वयंस्फूर्त काम करतात. तथापि त्यांनाही अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. नेत्रदानासंबंधी गैरसमज हा मोठाच अडथळा. संपूर्ण डोळा काढला जातो, नेत्रदान केल्यावर ती व्यक्ती पुढच्या जन्मात अंधच जन्माला येते, असे कितीतरी गैरसमज समाजात आढळतात. ते दूर करण्यासाठी संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते जीवाचे रान करतात. लोकांनीही त्यांना साथ देण्याची गरज आहे

## आरक्षणाचा मुद्दा येथेच संपत नाही...

मराठा आरक्षणाचा मुद्दा निकाली निघत आहे असे बऱ्याच लोकांना वाटण आहे. मुळात मराठा आरक्षणाचा मुद्दा हा कुणबी प्रमाणपत्र देऊन मुळीच निकाली निघत नाही. मराठा कुणबी हे एकच आहेत. अनेक मराठा बांधवाना कुणबी नावाखाली ओबिसीचे प्रमाणपत्र अगोदरच मिळालेले आहेत आणि त्यांनी ओबीसी प्रवर्गातुन फायदे देखील घेतले आहेत. परंतू आरक्षण हे विशिष्ट जातीलाच आहे, आरक्षण घेणे म्हणून हीन माणसिकता असे विचार डोक्यात असल्याने मराठा कुणबी समाजाने आरक्षण, संविधान यावर कधीच ठोस भुमिका घेतली नाही. ज्या मराठा कुणबी लोकांनी संविधान व आरक्षण आरक्षण यांचे समर्थन केले त्यांना पुरोगामी म्हणून लोकांनी वैचारिक वाळीत टाकले. मागास लोकांनाच आरक्षणाची गरज आहे व आम्ही मागास नाही म्हणून काही मराठा लोकांनी स्वतः ला कुणबी न संबोधता प्रत्येक ठिकाणी मराठा शब्द वापरला. परिणामी त्यांनी कुणबी लिहले ते ओबिसी मध्ये मोडले गेले, ज्यांनी मराठा लावला ते सर्वसाधारण प्रवर्गात राहीले. ज्या मराठा कुणबी लोकांनी आरक्षणाचा लाभ घेतला त्यांनी आपल्याच बांधवांना आरक्षणाविषयी व कुणबी लिहण्याविषयी माहिती देणे आवश्यक होते. परंतु वास्तविक परिस्थिती अशी होती की ज्या मराठा कुणबी लोकांनी ओबिसी आरक्षणाचा लाभ घेतला त्या लोकांनी आरक्षणांबद्दल एकही शब्द बोलला नाही. कारण त्यांच्या डोक्यात कदाचित असे विचार असतील की आरक्षण हे बोधीसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून दिले. आरक्षणाचा प्रचार केला तर कदाचित बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व संविधानाचे गुणगान गावे लागेल. कारण मनुच्या पिलावळींनी आरक्षण आणि संधिधान लोकांपर्यंत पोहचुच दिले नाही. हजारो हिंदुत्ववादी संघटना आहेत परंतु एकाही हिंदुत्ववादी संघटनेचे कुणबी मराठा यांच्या सह सर्व भारतीयांना समान हक्क अधिकार दिले यावर कधीच प्रबोधन केले नाही, आरक्षण बहुतांश हिंदु धर्मातीलच लोकांना लागु आहे व त्याचा फायदा सर्वात जास्त हिंदुनाच होतो याबद्दल कोणत्याही हिंदुत्ववादी संघटनांनी आरक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले नाही. उलट हिंदुत्ववादी संघटनांनी आरक्षण विरोधी भुमिका घेऊन हिंदु धर्मातीलच लोकांना ज्यांना आरक्षण मिळते अशाच लोकांना आरक्षण विरोधात उभे केले. संविधानावर कधी च हिंदुत्ववादी संघटना बोलत नाहीत उलट संविधान बदलायची भाषा करतात. महाराष्ट्रात मराठा समाज लोकसंख्येने जास्त असून सामाजिक वर्चस्व जास्त आहे. मनुच्या पिलावळींनी मराठा समाजालाच अज्ञानात ठेवून आरक्षण व संधिधान याबद्दल त्यांच्या डोक्यात तिरस्कार पेरला आणि बहुसंख्य मराठा समाज या षडयंत्रात फसला गेला. ज्यांनी मराठा समाजा सह प्रत्येक भारतीयांना हक्क अधिकार व आरक्षण बहाल केले हेच लपवून स्वतः ची सत्ता मजबूत करून महराष्ट्राचे व देशाचे शोषण करून स्वतः ची व्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केला त्याच लोकांना महाराष्ट्रात व देशात समस्या वाढवायला सुरुवात केली. जशा जशा समस्या वाढायला सुरवात झाली तशी तशी राजकीय खेळी करून आरक्षणाच्या मुद्यावर राजकारण करून सत्तेची पोळी भाजून घेतली. जसे मराठा कुणबी एकच असून मराठा वेगळे व कुणबी वेगळे दाखवले, धनगरांना अगोदरच आरक्षण असुन त्यांना पुन्हा आरक्षणासाठी लढवले गेले. हे असे कृत्य करून केवळ समाजात द्वेष व विषमता पसरवून सत्ता विशिष्ट लोकांच्या हातातच असावी यासाठी हा सर्व खटाटोप केला. आज हिंदु धर्म धोक्यात आहे म्हणून जातीय दंगलीमध्ये मराठा तरुणांचा वापर करून त्यांचे भविष्य उध्वस्त करत होते. परंतु मराठा हा कुणबीच आहे त्याला ओबिसी मध्ये आरक्षण मिळावे यासाठी जेव्हा महाराष्ट्र भर लाखोंचे मोर्चे निघतात, सध्या आंदोलन तिव्र रुप धारण करते तेव्हा हिंदुत्ववादी संघटना समोर येऊन मराठा लोकांना समर्थन करत नाही याचा अर्थ हिंदुत्ववादी लोकांचे व मराठा लोकांचे हिंदुत्व वेगळे आहे. मराठा लोकांचा हिंदुत्ववादी उपयोग करून घेतला जातो परंतू मराठा रस्त्यावर असताना हिंदुत्ववादी संघटना रस्त्यावर नसतात हे समजून घेतले तरच जागृती होईल. सरकारने ने कुणबीचे प्रमाणपत्र देऊ असे जाहीर केले परंतु मराठा मुळातच कुणबी आहे त्यांना सरकार कुणबी प्रमाणपत्र देऊन त्यांच्या वर उपकार मुळीच करत नाही. मराठा लोकांना कुणबीचे प्रमाणपत्र मिळून ओबिसी मधून लाभ देण्याची घोषणा केल्यावरही एकही मराठा कुणबी समोर येऊन एकही शब्द बोलला नाही की मी या अगोदरच याचा लाभ घेतला आहे. आरक्षणामुळे मी नोकरी शिक्षण घेऊ शकलो असे एकही लाभार्थी बोलुन दाखवत नाही. याचाच अर्थ आरक्षणाविषयी आजही गैरसमज लोकांच्या मनात आहेत. आरक्षणाच्या लाभार्थी जर आरक्षणा विषयी बोलले तर जागृती होईल आणि गरजु पर्यंत पोहचवता येईल. म्हणून एक गोष्ट लक्षात घेणे खुपच आवश्यक ती म्हणजे केवळ ओबीसीचे प्रमाणपत्र मिळाले म्हणून खुश होऊ नका. सरकारने ओबीबीचे प्रमाणपत्र दिले म्हणजे आरक्षण मिळालाचे असे नाही हे लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. आज ओबिसीचे प्रमाणपत्र सर्व मराठा लोकांना मिळेल, म्हणजे सर्व मराठा लोक ओबीसी प्रवर्गात येणार. म्हणजे ओबीसी प्रवर्गात संख्या वाढणार. संख्या वाढणार म्हणजे गर्दी होणार आणि गर्दी झाली तर ती कमी करावी लागणार. मग ओबीसी प्रवर्गातील गर्दी कमी करण्यासाठी ओबीसीचे घर मोठे करावे लागणार अर्थात ओबीसी कोटा वाढवावा लागणार. ओबिसी कोटा कधी वाढेल तर ओबीसी ची जनगणना झाली तर ओबीसीची लोकसंख्या माहिती होती लोकसंख्या माहिती झाली तर त्या प्रमाणात आरक्षण वाढेल. म्हणुन ओबीसीची जनगणना होणे अत्यंत आवश्यक आहे. असे नाही झाले तर सध्या ओबिसी प्रवर्गात असलेले ओबीसी बांधव मराठा लोकांना विरोध करून हा वाद कायम राहिल. आतमधले यांना आत येऊ देणार नाहीत. परंतु यांच्या कडे आत जाण्याची पास असल्याने हे मागे हटणार नाही. वाद ओबिसी मध्येच लागेल फायदा कोणाचा होईल हे जागरूक लोकांना चांगले कळेल. दुसरा व सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे सर्व सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण केले जात आहे. खाजगीकरणामध्ये आरक्षण लागु नाही. एकिकडे आरक्षणावर लढवून दुसरीकडे खाजगीकरणाच्या माध्यमातून आरक्षणच बंद केले गेले. इकडे आरक्षणासाठी किती तरी जिव गेले, किती तरी लोकांवर गुन्हे दाखल झाले आणि एवढा संघर्ष केल्या नंतर मुळात असलेले आरक्षण सरकार पुन्हा देण्याचे नाटक करत असेल पण प्रत्यक्षात अस्तित्वात च नसेल तर संघर्षाचा फायदा काय? म्हणुन खाजगीकरण थांबवण्यासाठी खुप मोठा लढा उभा करून आरक्षणाला संरक्षण देणे आवश्यक आहे. म्हणजे फक्त प्रमाणपत्र मिळाले म्हणजे आरक्षण नाही तर ओबीसी ची जनगणना करणे आणि खाजगीकरण थांबवने हे खरे आरक्षण मिळण्याचे मुख्य संकेत आहेत. नाही तर परिस्थिती अशी होईल एका विहिरीतील पाण्याचा वापर करण्यासाठी प्रत्येकाला पाण्याची मोटार देईल व सरकारी विहिरीवरील पाणी गरजेनुसार घ्या असे सांगेल आणि ती विहीर एका खाजगी कंपनीला विकुन टाकेल. तेव्हा कंपणीवाला त्या विहीरी वरचे पाणी भरू देणार नाही कारण ती खाजगी आहे. सरकारला विचारायला गेलो तर सरकार म्हणेल तुम्हाला सरकारी विहीरी चे पाणी भरायला सांगितले. या गोंधळात सरकारी विहीरीचा लिलाव होऊन खाजगी होतील आणि आपण मोटार घेऊन घरातच बसु. गरज पडली तर कंपणीच्या नळाने पैसे देऊन पाणी घेऊ हिच गत आज देशात होत आहे. म्हणून खाजगीकरण विरोधात खुप मोठा लढा उभा करणे खूप आवश्यक आहे. संविधान, आरक्षण, खाजगीकरण या साठी रस्त्यावर येऊन स्पष्ट बोलणे गरजेचे आहे. मराठा समाजानेच नाही तर इतरही लोकांनी संविधान घरात आणून वाचले असते. बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब समजून घेतले असते तर आरक्षण आणि हक्क अधिकार याबाबत अगोदरच ते जागृत झाले असते. परंतु आजही संविधान व बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना वाचले नाही म्हणून नसलेल्या समस्या आहेत असे भासवले गेले. म्हणून डोक्यातील विषमतेची घाण व चुकिची ऐकीव माहिती बाजूला सारुन संविधान व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वाचने आवश्यक आहे. ज्यांच्या डोक्यात समता बंधुता न्याय व स्वातंत्र्य आहे त्याच लोकांना संविधान व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे आपुलकी ने वाचु वाटतात. ज्या मराठा लोकांनी वाचायला सुरवात केली त्यांना आपण कुणबी ओबिसी असल्याचे पुरावे सापडले. ते ईतर कोणालाही मागण्याची गरज पडली नाही. आरक्षण अगोदरच घटनेत असून सरकारने जाणीव पुर्वक नाकारले. याची जाणीव झाली. या संघर्षातुन अजून वाचायची सवय लावली नाही व सत्य परिस्थिती समजून घेतली नाही तर संविधान व व्यवस्था समजणार नाही. संविधान आणि व्यवस्थाच समजली नाही तर समस्या सुटणार नाही. म्हणून प्रमाणपत्र मिळाले म्हणून आरक्षणाचा मुद्दा येथेच संपत नाही. हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

### जरांगे-पाटील यांचा आता

तिन्ही वेळीच्या चर्चा निष्फळ ठरली. चर्चेतून मराठा समाजाच्या पदरात काहीच पडत नसल्याने तसेच मुंबईत बैठक होऊनही कोणतेच आदेश निघाले नसल्याने उपोषण सुरूच आहे. सरकार वेळोवेळी वेळ मागून घेत आहे. त्यांनी महिना दोन महिने नाही, तत्काळ निर्णय घ्यावा अन् आरक्षण द्यावे असे ते म्हणाले आहेत. ते म्हणाले की, आता पुढील दिशा म्हणजेच आमरण उपोषण सुरु केले आहे. सरकारला कालपर्यंत दिलेला वेळ आता संपला आहे. मी माझ्या शब्दावर पक्का असून आता चार दिवस झाले आहेत. ती मुदत आता संपली आहे. त्यामुळे आजपासून पाणी आणि उपचार घेण्याचे बंद केले आहे.

### 'जे गेलेत त्यांच्यासाठी राष्ट्रवादी

आपल्या देशात झाल्या. एकदा इंदिरा गांधी या पंतप्रधान असताना झाली होती. पण त्यावेळी आज ज्या पद्धतीचं वातावरण होतं, तसं नव्हतं. त्यावेळी देखील जगातले लोक भारतात आले होते. जगातले राष्ट्रपती आपल्या देशात येतात त्यांचा सन्मान करणं आपलं कर्तव्य आहे. पण यामुळे मूलभूत प्रश्न सोडून काही ठराविक लोकांचा मोठेपणा दाखवण्यात आला आणि याची चर्चा आज ना उद्या देशांत नक्की होईल', असं शरद पवार म्हणाले.

### राष्ट्रीय लोकअदालतीत २३०

त्यामध्ये ९३ लाख रुपयांची वसुली करण्यात आली. अशी एकूण २३० प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली आहेत. या लोकअदालतीसाठी एकूण ४ पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती. या पॅनलमध्ये तदर्थ जिल्हा न्यायाधीश बी. बी. तोष्णीवाल, न्यायाधीश ए. ए. खंडाळे, न्यायाधीश ए. एस. सोनवलकर, न्यायाधीश एम.आर. कामत, यांनी काम पाहिले. या अदालतीमध्ये दिवाणी, फौजदारी व मोटार अपघात, कौटुंबीक वादाची न्यायप्रविष्ट प्रकरणे तसेच बँका , महावितरण यांची दाखल पुर्व प्रकरणे, वित्तीय संस्था आदी प्रकरणे ठेवण्यात आली होती.

सदरची लोकअदालत प्रथमच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान आझमी, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली होती. त्यासाठी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी वेळोवेळी बैठका घेवुन, पाठपुरावा करुन संपन्न केली.

सदर लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड. अर्जुन पाटील यांनी प्रस्तावना, व सूत्रसंचालन विधी स्वयंसेवक सुनिल यारगट्टीकर यांनी केले.

## रामोशी, बेरड समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी शासन कटीबद्ध : उपमुख्यमंत्री फडणवीस

पुणे : भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील रामोशी व बेरड समाजाचे योगदान लक्षात घेऊन या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटीबद्ध आहे. सामाजिक समतेला आर्थिक समतेशिवाय अर्थ नाही हे लक्षात घेवून शासनाने राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केले. पुरंदर तालुक्यात भिवडी येथे आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात दूरदृष्यप्रणालीद्वारे उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी संवाद साधला. यावेळी आमदार राहुल कुल, गोपीचंद पडळकर, माजी आमदार अशोक टेकवडे तसेच दौलतनाना शितोळे, बाबासाहेब जाधवराव, जालिंदर कामठे, अंकुशराव जाधव आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, रामोशी व बेरड असा उल्लेख करून त्याबाबतचा शासन निर्णयही प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. महामंडळाच्या माध्यमातून समाजातील युवकांना सक्षम करण्याचे काम करण्यात येईल. शिक्षण,आरोग्य आणि रोजगाराच्या संधी रामोशी समाजाला मिळण्यासाठी शासन प्रयत्न करेल. आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जीवनावरील चित्रपटाचा प्रस्ताव तयार झाला असून त्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. रामोशी आणि बेरड समाजाला जातीचे दाखले देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने अभियान राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

श्री. फडणवीस पुढे म्हणाले, भटक्या आणि विमुक्त जातीतील १० ऐवजी ५० विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या समाजातील बेघर नागरिकांना मोठ्या प्रमाणात घरे उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न असणार आहे. दहावी नंतर व्यवसायिक शिक्षण घेता यावे यासाठी वसतिगृहे उभारण्यात येत असून, याचा फायदाही रामोशी आणि बेरड समाजातील विद्यार्थ्यांना होणार आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

राजे उमाजी नाईक उत्तम संघटक व शासक

राजे उमाजी नाईक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानामुळे आपण स्वांतत्र्याचा अनुभव घेत आहोत. त्यांनी ५ हजार सशस्त्र सैन्य उभे करत इंग्रजांशी दिलेला लढा अंगावर रोमांच निर्माण करतो. वतनदार, सावकार यांना वठणीवर आणत त्यांनी गोरगरिबांची सेवा केली. ते उत्तम संघटक व शासक हाते. त्यांच्या न्यायनिवाड्यात गरिबांचे कल्याण होते. क्रांतिकार्याचा पहिला शिपाई महाराष्ट्रात जन्माला आला हा संदेश मोलाचा आहे. इंग्रजांनी ज्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालवून ज्यांना शिक्षा दिली त्यामधील पहिले नाव म्हणून राजे उमाजी नाईकांची ओळख आहे, म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक म्हटले जाते, अशा शब्दात उपमुख्यमंत्र्यांनी उमाजी नाईक यांच्या कार्याचा गौरव केला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन इंग्रजाविरुद्ध लढा दिला

रामोशी समाज हा राज्याचा आणि देशाचा रक्षणकर्ता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून उमाजी नाईकांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन परकीय सत्तेला हादरा दिला. त्यांनी १४ वर्ष इंग्रजांशी लढा दिला. या स्वातंत्र्यप्रिय समाजाने सुमारे ४०० वर्ष परकीय सत्तेला विरोध केला. ब्रिटीशांना सळो की पळो करुन सोडले. छत्रपती शिवाजी महाराजांनी गड-किल्ल्यांच्या रक्षणाची जबाबदारी या समाजावर सोपवली होती. रामोशी समाजाने गावातील वतने अत्यंत निष्ठेने राखले. समाजातील एकोपा, एकसंधता प्रशंसनीय आहे.

स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यातून स्वातंत्र्याची व स्वराज्याची सुरुवात


राजे उमाजी नाईक यांनी फेब्रुवारी १८३१ मध्ये स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध करताना दाखविलेली दूरदृष्टीदेखील कौतुकास्पद आहे. या जाहीरनाम्यात इंग्रजांच्या नोकऱ्या सोडण्याचे, कर न भरण्याचे, इंग्रजी खजिन्याची लूट करण्याचे आवाहन करण्यात आले होते. जनतेने देखील भक्कमपणे त्यांना साथ दिली. ही खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याची व स्वराज्याची घोषणा होती, असे उपमुख्यमंत्री म्हणाले.

आमदार श्री. पडळकर म्हणाले, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उमाजी नाईक यांचे मोठे योगदान आहे. देशातील गुलामीची खूण रामोशी समाजामुळे पुसली गेली. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात रामोशी समाजामुळे क्रांतीची बीजे पेरली गेली. राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून दरवर्षी ५० लाख रुपये देण्यात येत आहे, असेही ते म्हणाले. आमदार श्री. कुल म्हणाले, रामोशी व बेरड समाजाच्या विकासाठी शासन प्रयत्नशील आहे. समाजाच्या विकासाठी महामंडळ स्थापन केले असून त्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी देण्यात आलाआहे. येत्या अधिवेशनात या निधीमध्ये वाढ करण्याबरोबरच समाजातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही श्री. कुल यांनी सांगितले.यावेळी यशवंत शितोळे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## कन्या घोसरवाड शाळेची शिक्षणाबरोबरच सर्व क्षेत्रात भरारी : रोटरी अध्यक्ष सारंग बाळंखे

घोसरवाड : कन्या विद्या मंदिर घोसरवाड शाळा शिक्षणाबरोबरच खेळ, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात शाळेने भरारी मारली आहे.विद्यार्थिनीच्यांत उत्साह,शिस्त व आत्मविश्वास दिसून येतो.याबद्दल शिक्षकांचे अभिनंदन व शुभेच्छा.असे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम प्रेसिडेंट रो.सारंग बाळंखे यांनी केले.कन्या विद्या मंदिर घोसरवाड शाळेसाठी रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम मार्फत ८९,००० रुपयांच्या इयत्ता १ली ते ३री च्या वर्गासाठीच्या ५२ बेंचेस प्रदान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानी सरपंच साहेबराव साबळे होते.

दत्तवाडचे सरकार श्रीमंत भवानीसिंग घोरपडे यांच्या विशेष प्रयत्नाने शाळेच्या रुफकामासाठी दै.सकाळ रिलीफ फंडामार्फत ५ लाख रुपये श्रीमंत महेंद्रसिंग पिसाळ व राहूल गरड यांचे सहकार्याने प्राप्त झाले होते व बेंचीससाठी ८९,००० रुपये रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम यांचेकडून मिळविले.याबद्दल त्यांनी धन्यवाद दिले.यावेळी बोलताना ते म्हणाले, जिल्हा परिषदेच्या शाळांत शेतकरी, शेतमजूर,कामगारांची सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिकत आहेत. त्या विद्यार्थांनाही उच्च दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी शिक्षणाच्या चांगल्या सोई प्राप्त करुन दिल्या पाहिजेत. देश ग्रामीण भागात लपलेला आहे.समाजसेवी संस्थांनी शाळा दत्तक घेवून जिल्हयातील पहिल्या १० शाळांमध्ये या शाळेचा समावेश व्हावा अशी विनंती करतो.



पुण्याहून इतके लांब येवून ग्रामीण भागातील शाळेसाठी मदत केली याबद्दल ऋणी आहे. इथले विद्यार्थी उच्च पदांवर पोहचतील असे चांगले विद्यार्थी घडतील अशी अपेक्षा ठेवतो.

जानकी वृद्धाश्रमचे संचालक डॉ.बाबासाहेब पुजारी म्हणाले,कन्या शाळेने सर्वच क्षेत्रात चांगली कामगिरी केलेली आहे.शाळेसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.संगणक लॅबसाठी ३ संगणक देण्याचे जाहीर केले.

कन्या शाळेस भरघोस मदत केल्याबद्दल ग्रामपंचायत घोसरवाड मार्फत रोटरी अध्यक्ष रो.सारंग बाळंखे यांचा सत्कार सरपंच साहेबराव साबळे व माजी सरपंच मयूर खोत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शाळेच्या वतीने श्रीमंत भवानीसिंह घोरपडे यांच्या मार्फत सत्कार संपन्न झाला. शाळेच्या विद्यार्थिनींनी लेझीम पथक व स्वागत गीतांनी स्वागत केले.बहारदार नृत्य व मनोगतांनी पाहुण्यांना भारावून टाकले.शिक्षकदिनाच्या पार्श्वभूमीवर शाळेतील शिक्षकांना शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम चे डायरेक्टर राजेश वाडेकर,मेंबर डायरेक्टर पब्लिक इमेज राजेंद्र देशपांडे, पास्ट प्रेसिडेंट हेमंत पुराणिक, प्रा.बाळसिंग मिसाळ,शिक्षण विस्तार अधिकारी अनिल ओमासे,सुरचंद घुडाके,जयसिंग वडर,प्रदिप पाटील,शिवाजी भोसले, तुकाराम पाटील,सुभाष कांबळे, कुमार मुरगुंडे,दिपाली पुजारी, भाग्यश्री भिर्डे,जयश्री नंदिकुरळे,रमेश मारुती कोळी, विद्याधर मोकाशी,सहदेव माळी,गुंडा परीट,ज्योती परीट,राजू ढोणे उपस्थित होते. केंद्रीयप्रमुख तथा मुख्याध्यापक रमेश शंकर कोळी यांनी प्रास्ताविकात शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला.स्वागत शामराव कांबळे यांनी तर आभार मुख्याध्यापक दत्तात्रय कमते यांनी केले.सूत्रसंचलन दिलीप शिरढोणे यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# माणसाला सुखी व समाधानाने जिवन जगण्यासाठी पंचशीलतत्वाचे पालन करणे गरजेचे




वागदरी/ एस.के.गायकवाड : प्रत्येक माणसाला सुखी व समाधानाने जिवन जगण्यासाठी तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी बौद्ध धम्माच्या माध्यमातून सांगितलेल्या पंचशील तत्वाचे काटेकोर पणे पालन करणे ही काळाची गरज आहे.असे प्रतिपादन पूज्य भदंत सुमंगल (कपीलवस्तू बुद्ध विहार कराळी ता.उमरगा) यांनी वागदरी ता.तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले. वर्षावास समाप्तीच्या पुर्व संधेला आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते मोहन अर्जुन वाघमारे यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त धम्मदेशना (प्रवचन) व अभिष्टचिंतनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी भन्ते सुमंगल बोलत होते. प्रारंभी मोहन वाघमारे व त्यांच्या पत्नी जिजाबाई मोहन वाघमारे यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून सामुदायिकरित्या बुध्द वंदना घेऊन मोहन वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन रिपाइं (आठवले)चे उस्मानाबाद जिल्हा समन्वयक तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी केले.

या प्रसंगी माजी ग्रा.प.सदस्य रावसाहेब वाघमारे, जेष्ठ कार्यकर्ते धुळाप्पा वाघमारे,कुंडलीक वाघमारे, उत्तम झेंडारे,पांडुरंग बनसोडे,सेवानिवृत्त पो.कॉं.संदिपान वाघमारे,शिवाजी वाघमारे,गुरूनाथ वाघमारे, दत्ता कांबळे, दिपक वाघमारे,युवा कार्यकर्ते लक्ष्मण झेंडारे,आप्पा भंडारे,दाजी वाघमारे, बाळू कांबळे, सुर्यकांत वाघमारे,भारत वाघमारे,मुकेश धाडवे, अकाश झेंडारे,इंदुबाई वाघमारे, राधाबाई वाघमारे,मुक्ताबाई वाघमारे,कविता गायकवाड, कोमल झेंडारे,उज्वला वाघमारे,गीताबाई झेंडारे,कमलबाई धाडवे,ठकुबाई वाघमारे,श्रीदेवी वाघमारे सह महिला,ग्रामस्थ,युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरतेश वळवडे यांच्याकडून संपूर्ण दिवसाचे महाप्रसाद

## श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात भाविकांची गर्दी



अक्कलकोट/प्रतिनिधीः जयसिंगपूर, जिल्हा कोल्हापूर येथील भरतेश आदिनाथ वळवडे व कुंभारी येथील अभिजीत बिराजदार यांच्या वतीने श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात एक दिवशीय महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच दुपारची महाकाकड आरतीचा मान नागणसुरचे बसवराज प्रचंड व भरतेश वळवडे यांना मिळाला यावेळी शेकडो भाविकांनी टाळ्याच्या गजरात मारुतीचे दर्शन घेतले.

दक्षिणमुखी जागृत मारुतीच्या दर्शनासाठी आलेल्या शेकडो भाविकांनी पहाटे पाच वाजेची महा- पुजा,मारुती रुद्राभिषेक, होमहवन व महाआरतीमध्ये सहभागी झाले होते.ह्या पूजेच्या लाभ घेण्यासाठी भाविक भक्तांनी शनिवारी ४ वाजेपासुन गौडगांव येथील जागृत मारूतीच्या दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती.यावेळी श्री मारूतीच्या दर्शनासाठी आलेल्या भविकांच्या लांबच्या लांब रांगा लागलेली दिरुन आली.मंदिर समितीच्या वतीने दर्शनाची सुलभ सोयची व्यावस्था केली आली.

श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात संपूर्ण दिवसाचे महाप्रसाद देणाऱ्या मारुती भक्त जयसिंगपूर,जिल्हा कोल्हापूरचे भरतेश आदिनाथ वळवडे यांचा मारुतीचा फोटो व शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच दुपारच्या काकड आरतीचे मानकरी यांचे देखील मंदिर समितीच्या वतीने सन्मानित करण्यात आले.मारुतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना महाप्रसादाच्या रूपात अन्नदान केल्यास पुण्य प्राप्त होत असते.अशी भाविकांची श्रद्धा आहे.मनातील इच्छा व मनोकामना पूर्ण झालेल्या भक्तांकडून दर शनिवारी महाप्रसाद दिला जातो. मारुतीच्या दर्शनासाठी राज्य, परराज्यातुन आलेल्या हजारो भाविकांनी शनिवारी शांततेत श्री जागृत मारुतीचे दर्शन घेतले.यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे,सिद्राम वाघमोडे,प्रकाश मेथें,भारत ननवरे,चौडप्पा सोलापूरे,बिरप्पा पुजारी,परमेश्वर सुतार,ज्ञानेश्वर फुलारी,श्रीमंत म्हेत्रे, श्रीमंत सावळतोट,प्रकाश सनकळ,अमसिद्ध कोरे यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तालुकास्तरीय पावसाळी क्रीडास्पर्धेचे पारितोषिक वितरण आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते संपन्न




अक्कलकोट/प्रतिनिधीः पंचायत समिती शिक्षण विभाग,अक्कलकोट व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या विविध क्रीडा प्रकारातील विजेत्या, उपविजेत्या, तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या स्पर्धकांचे, संघाचे पारितोषिक वितरण समारंभ पंचायत समिती सभागृह, अक्कलकोट येथे तालुक्याचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, पंचायत समितीचे गट. विकास अधिकारी सचिन खुडे व गटशिक्षणाधिकारी कुदुसिया शेख यांच्या हस्ते संपन्न झाला.यात महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित, अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर ची गोळाफेक प्रथम क्रमांक विजेती कु. काजल चव्हाण व १७ वयोगट प्रथम क्रमांक कब्बडी मुलींच्या संघाची संघनायिका कु. करुणा हेगडे व संघातील खेळाडू मुलींचा तसेच१४ वयोगट खो-खो द्वितीय क्रमांक मुलांच्या संघाचा कप्तान कुमार विशाल जळकोटे व खेळाडू मुलांना चषक,प्रमाणपत्र व पदक देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रशालेचे मार्गदर्शक क्रीडाशिक्षक श्री. शहाजी माने, क्रीडासहायक श्री. स्वामीनाथ कोरे उपस्थित होते.याप्रसंगी तालुक्यातील विविध जिल्हा परिषद आणि हायस्कूल च्या सर्व विजेत्या, उपविजेत्या खेळाडूं तसेच उपस्थित क्रीडाशिक्षकांना संबोधित करताना आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी तालुकास्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदवून विजय प्राप्त करण हे सर्व संघाकरिता, खेळाडूंकरिता आव्हानात्मक असताना देखील आपण सर्वजण अत्यंत खेळाडूवृत्तीने खेळून जे यश संपादन केलात त्याबद्दल मला आपल्या सर्वांचा सार्थ अभिमान वाटत आहे.अशाचप्रकारे सातत्य ठेवून सराव केल्यास निश्चित पणाने आपण जिल्हास्तरावरही जिकंल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे.असे सांगून सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शक क्रीडाशिक्षकांचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सौ.जयश्री पुजारी यांना जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षकरत्न पुरस्कार जाहीर

सोलापूर/प्रतिनिधी : उठ बांधवा जागा हो ...गुरव समाजाचा धागा हो ...हे तत्व घेऊन राष्ट्रीय गुरव समाज महासंघ सोलापूर जिल्हा गुरव समाज संयुक्त विघामानेने दरवर्षाप्रमाणे दिला जाणारा जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षकरत्न पुरस्कार श्री.वीरतपस्वी प्राथमिक शाळा एम.आय.डी.सी.अक्कलकोट रोड सोलापूर येथील ज्येष्ठ शिक्षिका सौ.जयश्री सुनील पुजारी यांना नुकताच जाहीर झाला.त्यांनी आजपर्यंत शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या बहुमोल योगदान अशा कार्याची दखल घेवून त्यांनी विघार्थ्यांमधून बालकवी तयार करणे ,विविध स्पर्धा ,शिष्यवृत्ती धारक शिक्षक ध्येय ,विघार्थ्यांनाच नव्हे तर शिक्षकांनाही घडवत आहेत .विघार्थी आणि शिक्षक यांची जडणघडण करणारे ,लिहिते ,वाचते करणारे व विविध स्पर्धांच्या माध्यमातून विघार्थ्यांना कौतुकाची थाप देत असत गेली २९ वर्ष झाले सेवाकार्यरत असून विविध सहशालेय उपक्रमात भाग घेऊन अनेक



पुरस्कार प्रात्त ,पारितोषिके मिळाली आहेत .त्यांचे कार्य पाहून राष्ट्रीय पुरस्कार ,जिल्हास्तरीय ,राज्यस्तरीय ,रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान म्हणून २२वेळा रक्तदान केले.लोकसंख्य शिक्षण शालेय उपक्रमात राज्यस्तरावर उपक्रमाची निवड आजपर्यंत झाली आहे.शालेय उपक्रमात स्वच्छ भारत अभियान ,साक्षरता अभियान ,पर्यावरण रक्षण ,तंबाखु मुक्त अभियान ,रस्ता सुरक्षा मोहिम,प्लास्टिकबंदी ,कापडी पिशव्या वापर ,वृक्षारोपणन प्रत्येक वर्षी २५ प्रमाणे नियोजन ,वृक्षमित्र,स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव,माझी माती माझा देश अभियान ,शालेय उपक्रमात विविध चित्रकला स्पर्धा ,फलक लेखन स्पर्धा,करोना काळातील आरोग्यदूत काम ,शैक्षणिक साहित्य वाटप ,किराणा मालाचे कीट वाटप,लसीकरण मोहीम,रक्तदान मोहीम ,बालकांचे आरोग्यदूत म्हणून काम केले .विविध उपक्रमाद्वारे सामाजिक बांधिलकी जपण्याचा त्यांचा कायम प्रयत्न असतो अशा विविध कामामुळे दिनांक १० सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षकरत्न पुरस्कार यांच्या शुभहस्ते प्रा.डॉ.गौतम कांबळे प्रभारी कुलगुरु पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विघापीठ कार्यक्रमाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव प्रमुख उपस्थिती सुहास गुरव ,भाऊराव बिराजदार ,शशिकांत जिडीमनी ,काशीनाथ मेलगिरी,निंगराज विंचूरे,गंगाधर पुजारी यांच्या उपस्थिती देण्यात आला.



# शि.म. ज्ञानदेव मोहेकर गुरुजी पुण्यस्मरण विशेषांकाचे प्रकाशन

कळंब/प्रतिनिधीः ज्ञान प्रसारक मंडळाचे संस्थापक शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी यांच्या ३२ व्या पुण्यस्मरण निमित्ताने गुरुजींच्या स्वप्नपूर्तीसाठी कळंब शहरातून प्रकाशित होणारे सा.साक्षी पावनज्योत पुण्यस्मरण विशेष अंक २०२३ चे प्रकाशन दिनांक ६ सप्टेंबर २०२३ रोजी येरमाळा येथे ज्ञानोद्योग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक शिवाजी पौळ यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी पर्यवेक्षक व्यंकट कुंभार, सहशिक्षक दिलीप मोरे, बापूराव चांदणे, अनिल शिंदे, विजय राठोड, शैलेंद्र गट्टूवार, श्याम देवकर, सुहास बारकुल, ओम प्रकाश बर्वे, सतीश वाघमारे, अमर बारकुल, संदीप वेगळे, सुनील पाटील, विजयकुमार शिंदे, महादेव फुगारे,सयाजी बारकुल,विनोद बारकुल, देवदत्त मोहेकर, शरद बारकुल, सहशिक्षिका सीना शिरसट, प्रीती गोसावी,अश्विनी चेनलवाड, सुप्रिया कदम, अश्विनी कळसे, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# पंढरपुरात प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप



पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्याचे लोकप्रिय माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष राजू सतार मेकर बाळासाहेब कोलवार लोकमान्य विद्यालय पंढरपूर नगरपालिका पंढरपूर उर्दू शाळा येथे शंभर विद्यार्थ्यांना बॅग व पाण्याची बॉटल वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी युवक नेते रोहन परिचारक यांचे प्रमुख उपस्थिती होती शालेय गरजू विद्यार्थ्यांना रोहन परिचारकांच्या हस्ते बॅगचे वाटप करण्यात आले बाळासाहेब पवार यांच्या वतीने पिण्याचे बॉटल वाटप करण्यात आले

भाजप अल्पसंख्यांक सेल मोर्चाचे अध्यक्ष राजू सतार मेकर आणि उद्योगपती बाळासाहेब पवार यांनी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला पांडुरंग परिवार व युवक नेते रोहन परिचारक यांनी त्यांचे कार्याचे कौतुक केले. या सदर कार्यक्रमात शालेय विद्यार्थी शिक्षक व प्रमुख पाहुणे मा श्री रोहन परिचारक अल्पसंख्यांक सेलचे कार्यकर्ते व भाजप कार्यकर्ते व परिसरातील सर्व उपस्थित होते



# कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी एक मूठ धान्य गोळा करून वृद्धाश्रमास वाटप

टाकळी/ संजय चव्हाण :देशभक्त बाबासाहेब खंजिरे शिक्षण संस्थेच, दी, न्यू , हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज इचलकरंजी या संस्थेच्या वतीने एक उपक्रम राबवण्यात आला .एक मूठ धान्य विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात आले .व आमच्या श्रावण बाळ वृद्धाश्रम गुरुदत्त साखर कारखान्यासमोर अकिवाट येथील वृद्ध नागरिकांच्या साठी आज शनिवार ९ .९ .२०२३ रोजी सकाळी साडेदहा वाजता धान्य वाटप करण्यात आले .

नाईट कॉलेज येते हा कार्यक्रम संपन्न करण्यात आला .या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक .श्री .कोळी बी .ए. सर, प्रवेशक श्री .तराळ .डी. ए, सर .श्री .शिंदे एस .एम. सर संस्थेची शिपाई श्री महादेव शिंदे. वैभव पानदारे , औरंगजे चाचा मुजावर. शिवाजी कोळी आश्रमातील वृद्ध नागरिक उपस्थित होते. श्रावण बाळ संस्थेचे. सुरेश सासणे व शोभाताई पानदारे श्रीमती बोरगावे यांनी संस्थेचे आभार मानले.

# एकल महिलांना आनंदाचा शिधा वितरण करताना योग्य नियोजन करावे :उपसभापती निलम गोऱ्हे यांच्या सूचना



पंढरपूर/प्रतिनिधी : सणासुदीच्या काळात आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार मागील वर्षी दिवाळीमध्ये तसेच गुढीपाडवा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आनंदाचा शिधाचे रास्त दुकानातून वितरण करण्यात आले होते. आता गौरी गणपती सणानिमित्त आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.आनंदाचा शिधाचे वितरण करताना पुरवठा विभागाने एकल महिलांना शिधा वितरण करताना कोणताही त्रास होणार नाही याबाबत योग्य नियोजन करावे, अशा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती नीलमताई गोऱ्हे यांनी केल्या.

शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस प्रांताधिकारी गजानन गुरव, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, तहसीलदार सुशील बेल्हेकर, उपविभागीय अभियंता भीमाशंकर मेटकरी तसेच उपमुख्याधिकारी सुनील वाळुंजकर उपस्थित होते. यावेळी उपसभापती नीलम ताई गोऱ्हे यांनी पंढरपुरातील तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत सुरू असलेल्या व झालेल्या कामांची माहिती घेतली. पंढरपूर शहर व तालुक्यातील पाणीटंचाई, चारा टंचाई याबाबत सद्यस्थिती जाणून घेतली. तसेच मंदिर समिती मार्फत करण्यात येणाऱ्या कामांची माहिती घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या. त्याचबरोबर संभाव्य दुष्काळ परिस्थिती लक्षात घेता रोजगार हमीची कामे तत्काळ सुरू करावीत अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी पंढरपूर शहर व तालुक्यातील संभाव्य पाणी टंचाई , चारा टंचाई बाबत करण्यात येणाऱ्या नियोजनाची माहिती दिली. तसेच तालुक्यात कमी पावसामुळे पेरणीचे प्रमाण कमी झाले असून ४० टक्के उत्पादकता कमी झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तर आनंदा शिधा वितरणाबाबत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती तहसीलदार सुशील बेल्हेकर यांनी दिली.

उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

राज्याच्या विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी आज श्री विठ्ठलाची नित्यपुजा करुन श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांच्यासमवेत स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त श्रीमती जेहलम जोशी उपस्थित होत्या. तसेच मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, नित्योपचार विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

श्री. विठ्ठलाच्या पूजेवेळी श्रीमती. अनुसया फसळकर यांनी म्हटलेला काकडा उपसभापती डॉ. गोऱ्हे यांना प्रचंड भावला असून, शक्य असल्यास मंदिर प्रशासनाने या काकड्याचे शब्दांकन करावे असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. तसेच घरामध्ये पिढ्यानपिढ्या श्रावण महिन्यात पंढरपूरच्या श्री. विठ्ठलाची पूजा करण्याची प्रथा सुरू आहे. त्यानिमित्ताने आज विठ्ठलाची सेवा करण्याचा लाभ मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात दुष्काळाची छाया गडद होत चालली आहे. हे संकट दूर व्हावे आणि पाऊस पडावा असे साकडे त्यांनी श्री विठ्ठल चरणी घातले.

# करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी 'हार्ड वर्क' करणे अत्यंत आवश्यक : प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे

पंढरपूर/प्रतिनिधीः'अभियांत्रिकीमधून करिअर करताना कोणती ब्रँच मिळाली हे महत्वाचे नाही. त्यापेक्षा मिळालेली ब्रँच ही जगातील सर्वात चांगली ब्रँच आहे असे समजून त्या ब्रँचला योग्य न्याय देण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. मिळालेल्या ब्रँच मध्ये लीडर बनून त्या ब्रँचचे महत्व अनन्य साधारण असल्याचे सिद्ध करता आले पाहिजे कारण करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी 'हार्ड वर्क' करण्याची गरज आहे. 'हार्ड वर्क' केल्यामुळे यशस्वी होण्याचे प्रमाण वाढते.' असे प्रतिपादन स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट मधील अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए, एमसीए व पदविका या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात तसेच थेट द्वितीय वर्ष इंजिनिअरिंग व फार्मसीला प्रवेश घेतलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे हे मार्गदर्शन करत होते. प्रारंभी सर्व विद्यार्थी व पालकांचे गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आले. व्यासपीठावर पालक प्रतिनिधी म्हणुन फुलचंद पुजारी व महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.वैशाली दानवे हे उपस्थित होते. सांस्कृतिक विभाग व संवाद प्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी प्रास्ताविकात 'खर्डी सारख्या ग्रामीण भागापासून सुरुवात केलेल्या डॉ. बी. पी. रोंगे सर यांनी विद्यार्थ्यांसाठी १९९८ पासून तंत्रशिक्षणाचे एक आदर्श दालन खुले केले आणि त्या शिक्षण संकुलाच्या माध्यमातून शिक्षण घेतलेले ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी आज मोठ्या पॅकेजसह देशात आणि परदेशात स्थायिक झालेले असून ते उत्तम करिअर करत आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात 'स्वेरी'चा आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक आहे,' असे सांगितले. पुढे बोलताना सचिव व प्राचार्य डॉ.रोंगे म्हणाले की, 'नापास होणे, सेकंड क्लास मिळविणे ही बाब स्वेरीत अत्यंत अवघड आहे तर गुणवत्ता यादीत येणे, फर्स्ट क्लासमध्ये पास होणे या बाबी मात्र स्वेरीत खूप सोप्या आहेत. पालक व विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या माध्यमातून स्वेरीवर टाकलेला विश्वास मुळीच वाया जाणार नाही. विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी आमचा संपूर्ण स्टाफ सज्ज आहे. स्वेरीतून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आज अमेरिका, जपान अशा विविध देशात



जावून यशस्वी जीवन जगत आहेत.' असे सांगून टीव्ही, मोबाईल व तथाकथित मित्र या तीन गोष्टींपासून दूर राहण्याचा कानमंत्रही प्राचार्य डॉ. रोंगे यांनी दिला. पालक प्रतिनिधी म्हणून बोलताना फुलचंद पुजारी म्हणाले की, 'स्वेरीतून मिळणारे संस्कार, आदरयुक्त शिस्त आणि शिक्षण यामुळे विद्यार्थ्यांची झेप प्रगतीकडे होत आहे. स्वेरीत आलेल्या आदरयुक्त शिस्त व संस्काराच्या अनुभवामुळे माझ्या पाल्याचा स्वेरीत प्रवेश निश्चित केल्याचा अभिमान वाटतो आणि आपल्या पाल्यांचा बौद्धिक विकास हा स्वेरीच्या संस्कारित सानिध्यातून होणार आहे, हे मात्र निश्चित.' असे सांगून त्यांनी स्वेरीच्या मागील २५ वर्षांच्या शैक्षणिक कार्याचा विशेष गौरव केला. यावेळी पालक वासुदेव घाडगे, शिरीश लामगुंडे, संजय सोपल, सत्तार सय्यद यांच्यासह कांही पालकांनी प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांचा सत्कार केला. याप्रसंगी स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतिश मांडवे, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. करण पाटील, प्रथम वर्ष विभागप्रमुख डॉ.सतिश लेंडवे, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व विविध भागातून आलेले त्यांचे पालक असे मिळून सुमारे चार हजार विद्यार्थी व पालक या कार्यक्रमास उपस्थित होते. सांस्कृतिक विभाग व संवाद प्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

# मराठा आरक्षणासाठी पंढरीत तरुणाचे आमरण उपोषण सुरू




पंढरपूर/प्रतिनिधीः मराठा आरक्षणासाठी जालना जिल्हा येथील मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण सुरू असतानाच आत्ता पंढरपूर येथे गणेश जाधव या युवकाने येथील तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या उपोषण स्थळी पोलिसांकडून लाठीचार्ज झाल्यानंतर मराठा आरक्षणाची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून आंदोलनाचा भडका उडाला आहे. यामध्ये गाव बंद आंदोलन, रस्ता रोको , निषेध मोर्चा अशा विविध प्रकारचे आक्रमक आंदोलने सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सुऊ आहेत हि आंदोलने नियंत्रित करताना प्रशासन व पोलिसांची दमछाक होत आहे पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी येथील गणेश जाधव हा तरुण सकल मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पंढरपूर येथील तहसील कार्यालयासमोर आज शुक्रवार दि. ८ रोजी आमरण उपोषणास बसला आहे. याबाबत त्यांनी दि. ६ रोजी त्यांनी तसे प्रशासनास निवेदन देऊ केले आहे.

**आरक्षण मिळेपर्यंत उपोषण....**
**सकल मराठा समाजाला आरक्षण मिळावे. यासाठी तहसील कार्यालयासमोर आपण आमरण उपोषणाला बसलो असून सकल मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत आपण उपोषणावर ठाम राहणार आहे.**
**–गणेश जाधव उपोषणकर्ता, पंढरपूर**

# विशेष मोहिमेतर्गंत तब्बल २५८ प्रकरणांचा निपटारा

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर जिल्हा न्यायालयामध्ये दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीच्या अनुषंगाने दिनांक ४ ते ८ सप्टेंबर, २०२३ या कालावधीमध्ये विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या विशेष मोहिमेतर्गंत पंढरपूर न्यायालयातील एकुण २५८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी दिली.फौजदारी प्रक्रिया संहिता कायदा कलम २५६ व २५८ ची एकुण ३४८ प्रकरण दिनांक ४ ते ८ सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये ठेवण्यात आलेली होती, त्यामध्ये एकुण २५८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला आहे. यामध्ये न्यायदंडाधिकारी पी. पी. बागुल यांनी ३२ पैकी २४ प्रकरणे, न्यायदंडाधिकारी ए. एस. सोनवलकर यांनी ५८ पैकी १३ प्रकरणे, न्यायदंडाधिकारी श्रीमती पी. एन. पठारे यांनी २८ पैकी २८ प्रकरणे तसेच सर्वाधिक जास्त श्रीमती एस. ए. साळुंखे यांनी २३० पैकी १९० प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला आहे. विशेष मोहिमेतर्गंत आयोजनामुळे मोठ्या प्रमाणात छोट्या छोट्या प्रकरणांचा निपटारा होत असल्याने पक्षकार व विधीज्ञांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गेल्या साठ वर्षापासून सिन्नर हद्दीतील लोकांना मतदानापासून वंचित

अक्कलकोट/प्रतिनिधीः सिन्नुर ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजी नगर तांडा , म्हेत्रे तांडा , म्हेत्रेतांडा २ मधील लोकांची सिन्नुर ग्रामपंचायत येथे फक्त कागदोपत्री



नोंद असून, ग्रामपंचायत मतदान करण्याचा अधिकार नाही मतदार यादी मध्ये नावे नाहीत मात्र शासनाचे विविध कर भरले जाते या वस्तीचे लोकसंख्या सुमारे १२०० इतकी असून गेल्या ६० वर्षापासून सदर भागात वास्तव्यास आहेत . पण कुठेही ग्रामपंचायत मतदानाचा अधिकार नाही आणि ग्रामपंचायत मतदार यादीत नावे ही नाहीत . तसेच स्मशान भूमीसाठी ६० गुंटे जागा गट नं २७८ / १ मध्ये नोंद असून ती जागा बंजारा समाज दहन व दफनभूमी म्हणून मंजुर करण्यात यावे . व ग्रामपंचायात मतदार यादीमध्ये नावे समाविष्ठ करून ग्रामपंचाया त मतदानाचा अधिकार मिळवून देण्याची मागणी अक्कलकोटचे तहसिलदार बाळासाहेब सिरसट यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे . यावेळी निवृत भुगर्भ शास्त्रज्ञ नरसिग राठोड , विश्वनाथ राठोड , लोकेश राठोड , पोमू राठोड ई उपस्थित होते . शासनाने त्वरीत लक्ष्य घालून आमचे मतदार यादीत नाव नोंद करून ग्रामपंचायत मतदान करण्याचा अधिकार मिळवून द्यावा व स्वतंत्र स्मशान भूमी मंजुर करून द्यावी नरसिंग राठोड , निवृत भुगर्भ शास्त्रज्ञ म्हेत्रे तांडा दुध

# दुधनी दूरक्षेत्र येथे गणेशोत्सव व ईद ए मिलाद निमित्त शांतता मिटींग संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यात दुधनी येथे दूरक्षेत्र येथे गणेशोत्सव व ई ए मिलद निमित्त शांतता कमीटीची घेण्यात आली सदर बैठकी मध्ये मिरवणूक शांतता व सौऊंड कमी शांतता पार पडणे बाबात दकीण पोलिस ठाण्यात कर्तव्य दक्ष मा. पो.निरीक्षक स्वामी साहेबानी गणेशोत्सव मंडळींना सुचना दिल्या व मार्गदर्शन केले. पो.पनिरीक्षक रावण काळे साहेब पो.राजेंद्र कोळी साहेब पो.कॉ सचिना गायकवाड व पोलिस पाटील गावतील नागरिक उपस्थित होते



# श्री सरस्वती हायस्कूल, टाकळी वाडीचे नाटीकरणामध्ये तिसरा क्रमांक



टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री सरस्वती हायस्कूल शाळेच्या विद्यार्थ्यांनी नाट्यीकरण स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावला. ९ सप्टेंबर जयसिंगपूरमध्ये तालुका स्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धा पार पडल्या . या स्पर्धेसाठी ११ संघ सहभागी होते. यामध्ये श्री सरस्वती हायस्कूल , टाकळीवाडीला तृतीय क्रमांक मिळाला . सर्वत्र या विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

यासाठी शालेय समितीचे चेअरमन , सदस्य , मुख्याध्यापक मा. श्री संजय तपासे सर , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन मिळाले .

# अजितदादा पवार यांच्या हस्ते सचिन बेंडभर पाटील यांना पुरस्कार

पुणे :पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध युवा साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर पाटील यांना शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षक पुरस्कार उपमुख्यमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते व पुण्याचे पालकमंत्री माननीय श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत अल्पबचत भवन, पुणे येथे शनिवार ९ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.१२ फेब्रुवारी २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तुंग यश मिळवल्याबद्दल महाराष्ट्रातील प्रसिद्ध बालसाहित्यिक, पाठ्युस्तकातील कवी व शिष्यवृत्ती तज्ञ सचिन बेंडभर पाटील यांना शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षक पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांच्या हस्ते व पुण्याचे पालकमंत्री माननीय श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत अल्पबचत भवन, पुणे येथे आयोजित केलेल्या भव्य कार्यक्रमात शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन प्रदान करण्यात आला. पुणे जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय श्री. रमेश चव्हाण, प्राथमिक




शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुनंदा वाखारे, कमलाकांत म्हेत्रे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

साहित्य क्षेत्रातील बाल साहित्यात नेहमीच रममान असणाऱ्या बेंडभर पाटील यांच्याकडे सन २०२३ या वर्षी पाचवी शिष्यवृत्तीचा वर्ग आल्यानंतर वर्षभर एकही सुट्टी न घेता त्यांनी शाळेतील मुलांचे जादा तास घेतले. सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत त्यांनी मुलांचा शिष्यवृत्ती प्रश्नपत्रिकांचा सराव घेतला. वर्षभर जवळ जवळ शंभर प्रश्नपत्रिकांचा सराव घेत त्यांनी मुलांची जोरदार तयारी करून घेतली. याचेच फलित म्हणून शिष्यवृत्ती निकालात त्यांनी भरघोस यश मिळवले. त्यांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचा अक्कलकोट येथे नवनाथ धस परिवाराकडून स्वागत सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी : लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांची शिवशक्ती परिक्रमा यात्रा समर्थांच्या अक्कलकोट नगरीत समर्थांच्या दर्शनासाठी आली असता गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानचे सचिव सामाजिक कार्यकर्ते श्री नवनाथ धस व त्यांच्या पत्नी सौ. रिंकू धस यांनी पंकजाताईंचे औक्षण करून शॉल हार व स्वामी समर्थांची मूर्ती देऊन स्वागत सत्कार केला .त्यासोबतच पंकजाताई मुंडे या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून विराजमान व्हाव्या



अशा सदिच्छा त्यांना देवून स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना करून पंकजाताईंना त्यांच्या शिवशक्ती परिक्रमा यात्रेचे चांगले फळ मिळो अशा शुभेच्छा दिल्या . याप्रसंगी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष परमेश्वर आरबळे प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व सर्व कार्यकर्ते तसेच मुंडे समर्थक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .



कोन्हाळी गावचे माजी सरपंच सुमित्रा बाबुराव बनसोडे यांची कन्या (मुलगी) कु. एकता बाबुराव बनसोडे ही उच्च शिक्षणासाठी परदेशी लंडन येथे पुढच्या आठवड्यात जाणार आहे, त्यानिमित्ताने कोन्हाळीकरांनी छोटेखानी सत्कार कार्यक्रम आयोजित केले होते तरी या कार्यक्रमास उपस्थित राहून रिपाइं आठवले गटाच्या वतीने सत्कार करून पुढील प्रदेशातील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आले यावेळी रिपाइं आठवले अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे,पत्रकर राजेश जगताप, स्वामीराव गायकवाड,शुभम मडिखांबे,गणेश दादा पवार,माजी सरपंच सुमित्रा बाबुराव बनसोडे आदी ग्रामस्थ समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते